मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 17 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# आरक्षणाची उलथापालथ, राजकीय दिग्गजांची कसोटी!

## पिंपरी-चिंचवड मनपा निवडणूक : प्रभाग 4 (दिघी-बोपखेल)

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बहुप्रतिक्षित प्रभाग क्रमांक ४ (दिघी-बोपखेल) मध्ये यावेळी झालेल्या आरक्षण बदलांमुळे आणि विद्यमान राजकीय समीकरणांमुळे मोठी चुरस निर्माण झाली आहे. सुमारे ५५ हजार मतदारांच्या या प्रभागात अनेक राजकीय दिग्गजांना यंदा मोठी कसरत करावी लागणार आहे, विशेषत: महिलांच्या वाढलेल्या सहभागामुळे लढत अधिक लक्षवेधी ठरणार आहे.

**आरक्षणाचा मोठा परिणाम: SC गट महिलांसाठी राखीव**

सर्वात मोठा बदल म्हणजे अनुसूचित जाती (SC) पुरुष गट आता अनुसूचित जाती महिलांसाठी (SC WOMEN) राखीव झाला आहे. यामुळे २०१७ मध्ये या गटातून लढलेले इच्छुक पुरुष नेते आता त्यांच्या पत्नींसाठी तिकीट मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. हा बदल अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांच्या राजकीय भवितव्यावर परिणाम करणारा ठरला आहे.

(उर्वरित पान २ वर)




### राजकीय नेतृत्व

» आमदार महेश दादा लांडगे यांचे जातीने लक्ष असल्याने भाजपची बाजू भक्कम आहे, तर राष्ट्रवादीची मात्र नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्या अभावी सगळी भिस्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरच आहे. एकंदरीत, दिघी-बोपखेल प्रभाग ४ मध्ये यंदा आरक्षण, इच्छुकांची गर्दी आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न यामुळे अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.

### भाजपसमोरील आव्हाने आणि जमेची बाजू

» आव्हान : विरोधकांच्या आरोपांचे खंडन करणे. संघटन कौशल्य आणि मागील विजयाचा आत्मविश्वास.

» जमेची बाजू : झालेल्या कामांचे दाखले प्रभावीपणे देणे. राज्यातील सत्तेचा फायदा.इच्छुकांची गर्दी पाहता अंतर्गत गटबाजी थोपवणे. आमदार महेश दादा लांडगे यांचा प्रभागात असलेला वचक, तळागळातील कार्यकर्त्यांना असलेले पाठबळ, प्रभागात असलेले लक्ष जमेची बाजू आहे.

### राष्ट्रवादीसमोरील आव्हाने आणि जमेची बाजू

» आव्हान :सत्ताधाऱ्यांनी पूर्ण न केलेल्या कामांचे दाखले जनतेपर्यंत पोहोचवणे. सत्ताधारी पक्षाने न केलेल्या कामांचा थेट फायदा, संघटन उभे करणे आणि सक्षम उमेदवाराची निवड करणे.

» जमेची बाजू :भाजपसारखी उमेदवारीसाठी फारशी रस्सीखेच नसल्याने विरोधी गटातील सक्षम उमेदवार इकडे वळण्याची शक्यता.

---

# उत्साह तोच, ठिकाण नवे.. 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' यंदा मोशीत..!

## भव्य 'रिव्हर सायक्लोथॉन' उपक्रम यंदा मोशी येथील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे आयोजित केला जाणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचा संदेश देणारा भव्य 'रिव्हर सायक्लोथॉन' उपक्रम यंदा मोशी येथील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे आयोजित केला जाणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.




आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धन आणि नदी स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रतिवर्षी 'रिव्हर सायक्लोथॉन'चे भोसरी येथील गावजत्रा मैदानावर आयोजित केले जाते. मात्र, सायकलपटू आणि पर्यावरण प्रेमींचा वाढता प्रतिसाद पाहता यंदा अधिक प्रशस्त आणि सुव्यवस्थित ठिकाण निवडण्यात आले आहे. स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे होणार आहे. पुणे–नाशिक महामार्गाजवळील हे ठिकाण मोठ्या संख्येने सहभागी होणाऱ्या सायकलस्वारांसाठी सोयीस्कर आहे. दर सायक्लोथॉन रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता मोशी येथून सुरू होईल. यंदा तब्बल ३५ हजाराहून अधिक सायकलस्वार सहभागी होणार आहेत. पर्यावरण, आरोग्य आणि भावी पिढ्यांच्या संरक्षणासाठी समाजातील सर्व लोकांना एकत्र आणण्याचा उद्देश आहे. उपक्रमाचे आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. मुख्य संदेश "एक पाऊल भावी पिढीसाठी" ह्या ब्रीदवाक्याखाली पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य जागृतीला प्राधान्य देणे आहे.

> "उत्साह तर नेहमीचा आहे, फक्त ठिकाण नवे! मोशीतील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण येथे आयोजित 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' मध्ये प्रत्येक सायकलस्वाराचा उत्साह आणि ऊर्जा आम्हाला पहायला मिळणार आहे. पर्यावरणाच्या संदेशासाठी, इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी आणि भावी पिढ्यांसाठी या उपक्रमात पर्यावरण प्रेमी, अबालवृद्धांनी सहभागी व्हावे. या ठिकाणी प्रशस्त पार्किंग आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. वसुंधरा संवर्धनाचा जागर या निमित्ताने करुन विक्रमी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करीत आहोत.
>
> - डॉ. निलेश लोंढे, मुख्य समन्वयक.

# महापालिका निवडणुकीसाठी 128 जागा लढविण्याची तयारी करा

## अशा स्पष्ट सूचना शिवसेनेचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसैनिकांना दिल्या




**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीला पूर्ण ताकदीने सामोरे जायचे आहे. त्यासाठी ३२ प्रभागातील १२८ जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी करावी, अशा स्पष्ट सूचना शिवसेनेचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसैनिकांना दिल्या. तसेच युतीबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. जो निर्णय होईल, त्याची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने शिवसेनेचा शनिवारी (१५ नोव्हेंबर) पिंपरीत पदाधिकारी प्रशिक्षण मेळावा पार पडला. यावेळी महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, महिला संघटिका सरिता साने यांनी केले आहे. उपनेत्या सुलभा उबाळे, इरफान सय्यद, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, महिला संघटिका सरिता साने, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, निलेश बारणे, बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका विमल जगताप, जिल्हा समनव्यक बाळासाहेब वाल्हेकर, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचारणे, उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढारकर, युवासेना शहर प्रमुख माऊली जगताप, युवतीसेना शहर प्रमुख रितू कांबळे, लोकसभेचे युवा सेनेचे अध्यक्ष राजेंद्र तरस, निलेश मुटके, सायली साळवे आदी उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन महानगर प्रमुख राजेश वाबळे यांनी केले होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भाजप आणि शिवसेनेची नैसर्गिक युती आहे. महापालिका निवडणुकीत युतीबाबतचा निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल. भाजपसोबत युतीला प्राधान्य आहे. शिवसेना पूर्ण ताकदीनिशी महापालिका निवडणुकीत उतरणार आहे. शिवसेनेने १२८ जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. शिवसैनिकांनी गाफील राहू नये. मतदारयाद्यांकडे लक्ष द्यावे. प्रभागाचा बारकाईने अभ्यास करावा. सूक्ष्म नियोजन करून कामाला लागावे. महापालिका सभागृहात शिवसेनेचे संख्याबळ वाढवायचे आहे. त्यादृष्टीने कामाला सुरुवात करावी.

उपनेत्या सुलभा उबाळे म्हणाल्या, शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेतून महिलांना आर्थिक मदत मिळत आहे. महिला मोठ्या संख्येने शिवसेनेसोबत जोडल्या आहेत. शिंदे मुख्यमंत्री असताना आणलेल्या लोकोपयोगी योजना आणि महायुती सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवव्यात. लोकांना लाभ मिळवून द्यावा.

# आरक्षणाची उलथापालथ, राजकीय दिग्गजांची कसोटी!

(पान 1 वरून)

**पिंपरी | प्रतिनिधी**

**भाजपसमोर ओबीसी महिला गटात मोठी डोकेदुखी**

ओबीसी महिला (क) गटात भाजपसाठी सर्वात मोठी अडचण उभी राहिली आहे. माजी नगरसेविका हिराबाई घुले आणि निर्मला गायकवाड या दोघीही ओबीसी महिला असल्याने त्यांना एकाच गटातून निवडणूक लढवावी लागणार आहे. दोन्ही प्रबळ दावेदार असल्याने, यापैकी एकाच उमेदवाराची निवड करणे हे भाजप नेतृत्वासाठी आव्हान ठरणार आहे, ज्यामुळे अंतर्गत गटबाजीची शक्यता नाकारता येत नाही. मूळ ओबीसी उमेदवार वर्ग डोकं वर काढण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे अजून स्पर्धा निर्माण होणार आहे.

**ड खुला पुरुष गट: इच्छुकांची भाऊगर्दी**

प्रभाग ४ मधील ड खुला पुरुष गटाकडे असल्याने या गटात इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. भाजपमधून: युवा नेतृत्व ज्यांच्याकडे संघटन कौशल्य, मितभाषी, नम्र असलेले उदय गायकवाड, कुलदीप परांडे, संजय गायकवाड, हे प्रमुख दावेदार म्हणून समोर आहेत. तसेच राष्ट्रवादीतून: माजी नगरसेवक चंद्रकांत वाळके हे प्रबळ इच्छुक आहेत.

**अनुसूचित जमाती गट: नव्या चेहऱ्यांची तयारी**

माजी नगरसेवक लक्ष्मण उंडे यांच्या निधनामुळे अनुसूचित जमाती (ब) गटातील जागा रिक्त झाली आहे. भाजप: माजी नगरसेविका आशा सुपे यांचे पती रवींद्र सुपे आणि कृष्णाजी सुरकुले हे प्रमुख दावेदार आहेत. राष्ट्रवादी: मंगेश असवले हे रिंगणात उतरण्यास इच्छुक आहेत. दरम्यान, अनुसूचित जाती महिला गटात राष्ट्रवादीच्या प्रतिभा दोरकर या भाजपच्या श्रुती विकास डोळस, प्रिती प्रशांत पठारे, सुनिता रमेश डोळसयांच्यासमोर मोठे आव्हान उभे करण्याची शक्यता आहे.

**कामांचे आव्हान आणि मतदारांचे बदललेले स्वरूप**

२०१७ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला या प्रभागात एकहाती यश मिळाले असले तरी, खंडित वीजपुरवठा यासारख्या मूलभूत प्रश्नांवर विरोधक भाजपला घेरण्याच्या तयारीत आहेत. मात्र याबाबत आमदार महेश लांडगे आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये बैठक झाली असून, महावितरणकडे पाठपुरावा सुरु असल्याचे समजते.

हा प्रभाग कॉस्मोपॉलिटन स्वरूपाचा आहे. परप्रांतीय मजूर, कामगार, आयटी क्षेत्रातील तरुण वर्ग, पेन्शनर आणि माजी सैनिक यांचा येथे मोठा वाटा आहे. मोठ्या टाऊनशिपमुळे तरुण वर्ग या भागाकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे, निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधीसमोर मूलभूत सुविधांसह विकासात्मक बदल घडवण्याचे मोठे आव्हान असणार आहे. नवमतदार आणि गावातील जुना जाणता वर्ग कोणाच्या बाजूने कौल देतो, यावरच या प्रभागाचे भविष्य अवलंबून आहे.

# सेवा विकास बँकेतील धक्कादायक प्रकार; शासनाच्या परवानगीशिवाय बँक बंद व 205 कामगाराची कपात..

## कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांची मध्यस्ती 205 कामगारांना कामावर घेण्याचे सहाय्यक कामगार आयुक्ताचे Liquidator ला आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

सेवा विकास को-ऑपरेटिव्ह बँक पिंपरीमध्ये शासनाची व कामगार विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता सुमारे 205 कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना LIQUIDATOR यांनी कामावरून कमी केले होते.राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी मध्यस्थी केल्यानंतर सहाय्यक कामगार आयुक्त यांनी कामगारांना कामावर घेण्याचे आदेश दिले आहेत. अशी माहिती कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी पिंपरी येथे (दि.१६) पत्रकार परिषदेत दिली.

युवानेते दिनेश पाटील, संघटनेचे कार्यकारणी सदस्य मिलिंद देशपांडे व सोमनाथ वीरकर तसेच कर्मचाऱ्यांच्या वतीने राकेश गायकवाड,गणेश शेलार, नजीम शेख, गजानन हेंडे, सागर बोडके, विनोद साळवे, संदीप धावडे, गणेश काशिद, सुजितकुमार चव्हाण व मोठ्या संख्येने बँक कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,मागील तीन वर्षांपासून बँकेचे नियमित कामकाज बंद असून केवळ कर्जवसुलीचे काम सुरू आहे. दीर्घकाळ सेवा बजावलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर 2022 मध्ये बेकायदेशीररित्या सेवा समाप्तीची पत्रे देण्यात आल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बँक अचानक बंद करताना कोणतीही वैध कारणे सांगण्यात आलेली नाहीत तसेच महाराष्ट्र शासनाकडून बँक बंद करण्याची किंवा मोठ्या प्रमाणावर कामगार कमी करण्याची शासनाची कोणतीही मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून 205 कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अनेकजण उपजीविकेअभावी अत्यंत अडचणीत असल्याचेही सांगण्यात येत आहे. एका कर्मचाऱ्यांनी गळफास घेत आत्महत्या केली असून दुसऱ्याचे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे.

दरम्यान, बँकेवर नियुक्त LIQUIDATOR यांनी कर्मचाऱ्यांना "बँक लवकरच सुरू होईल व देणी दिली जातील" अशी आश्वासने दिली असली तरी तक्रार केली तर कर्मचाऱ्यांचे नुकसान होईल, असा दबाव आणला असे कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परिणामी कर्मचारी कामगार कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यास घाबरत होते.यातील काही कर्मचारी 'राष्ट्रीय श्रमिक आघाडी' या संघटनेचे सदस्य झाले असून, बँक बेकायदेशीररित्या बंद करण्याबाबतची तक्रार औपचारिकरीत्या दाखल करण्यासाठी त्यांनी संघटनेला अधिकृतरित्या अधिकार दिले आहेत. तसेच कामगार कार्यालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय आणि उच्च न्यायालयातही आवश्यक त्या कायदेशीर प्रक्रिया राबविण्याची तयारी संघटनेने दर्शविली आहे अशी माहिती कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी दिली.

कर्मचाऱ्यांनी सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार कार्यालय पुणे यांना प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बँकेकडून परवानगी न घेता करण्यात आलेल्या सेवा समाप्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.सहाय्यक कामगार आयुक्त यांनी बँक बेकायदेशीर रित्या बंद केली असून ती पूर्ववत चालू करावी व बँकेतील कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचे पत्र LIQUIDATOR ला दिले असून कर्मचारी कामावर रुजू होण्यास आल्याने LIQUIDATOR चे धाबे दणाणले आहेत.

बेकायदेशीर कामगार कपात आणि बँकेचे विभाग बंद करणे हे लिक्विडेटरला भोवणार असून कामगार कार्यालय त्यांच्याविरुद्ध फौजदारी खटले दाखल करू शकते. यावर बँक लिक्विडेटर काय भूमिका घेतात याकडे सर्व शहराचे लक्ष लागले आहे.

# पहिल्याच दिवशी महापालिकेच्या तिजोरीत 6 कोटी 28 लाख जमा !

## महापालिकेला विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी महापालिकेने अभय योजना सुरु केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकर थकबाकीदारांकडून थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने सुरू केलेल्या 'अभय योजने'त पहिल्या दिवशी ६ कोटी २८ लाख रुपयांची थकबाकी महापालिकेच्या तिजोरीत जमा झाली. शनिवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत ११२७ थकबाकीदारांनी ही रक्कम भरली.

महापालिकेला विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी महापालिकेने अभय योजना सुरू केली आहे. महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये २ हजार कोटी, मोबाइल टॉवरची ४ हजार २५० कोटी आणि जुन्या हद्दीतील ६ लाख ३७ हजार ६०९ मिळकतींची सुमारे १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची थकबाकी आहे. त्यासाठी १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत अभय योजना राबविली जाणार आहे.

अभय योजनेत थकीत मिळकतकरावर महापालिकेने दोन टक्के प्रति महिना या दराने आकारलेल्या दंडाच्या रकमेवर सुमारे ७५ टक्के सूट मिळणार आहे. निवासी, बिगरनिवासी व मोकळ्या जागा अशा ४ लाख ८१ हजार मिळकतींच्या लाभार्थ्यांना अभय योजनेचा फायदा होणार आहे. शनिवारी, पहिल्याच दिवशी ६ कोटी २८ लाख रुपयांची रक्कम महापलिकेच्या तिजोरीत जमा झाल्याची माहिती प्रशासनाने दिली.

महानगरपालिका प्रशासनाने मिळकतकर थकबाकी वसूल करण्यासाठी सुरू केलेल्या 'अभय योजने'ला नागरिकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. योजनेच्या पहिल्याच दिवशी महापालिकेच्या तिजोरीत 6 कोटी 28 लाख रुपयांची थकबाकी जमा झाली. शनिवारी (15 नोव्हेंबर) सायंकाळी 6 वाजेपर्यंत एकूण 1127 थकबाकीदारांनी या सवलतीचा लाभ घेतला. मात्र मागील 'अभय योजने'चा लाभ घेतलेल्या थकबाकीदार मिळकतदारांना मात्र या सवलतीचा फायदा मिळणार नाही.

या योजनेअंतर्गत, थकबाकीदार नागरिकांना त्यांच्या थकीत मिळकतकरावर पुणे महापालिकेने दरमहा दोन टक्के (2%) दराने आकारलेल्या दंडाच्या रकमेवर सुमारे 75 टक्के सूट दिली जाणार आहे. त्यामुळे ही वाढलेली थकबाकी भरण्यासाठी नागरिकांना मोठी संधी मिळाली आहे. पुणे महापालिकेकडे मिळकतकराची एकूण थकबाकी 13 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. या प्रचंड रकमेत जुन्या हद्दीतील 6 लाख 37 हजार 609 मिळकतींचा समावेश आहे, ज्यात 9 हजार कोटी रुपये दंड आणि 3 हजार 158 कोटी मूळ कराची रक्कम आहे. 15 नोव्हेंबरपासून सुरू झालेली ही योजना 15 जानेवारी 2026 पर्यंत म्हणजेच दोन महिने चालणार आहे. मिळकतकराची थकबाकी वर्षानुवर्षे थकीत असल्याने महापालिका दर महिन्याला त्यावर दोन टक्के व्याज (दंड) आकारते, ज्यामुळे थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढली आहे.




### गुलाबपुष्प देऊन स्वागत

» या योजनेची सुरुवात झाल्याने शनिवारी महापालिकेची मुख्य इमारत, १५ क्षेत्रीय कार्यालये व ५९ नागरी सुविधा केंद्र या ठिकाणी फलक, बॅनर लावून, तसेच रांगोळी काढून सजावट करण्यात आली होती. थकबाकीची रक्कम भरण्यासाठी आलेल्या करदात्यांचे निरीक्षक, पेठ निरीक्षक यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

### काय आहे अभय योजना

» नागरिकांकडे असलेली मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी 'अभय योजना' राबविली जाणार आहे. यासाठी थकबाकीच्या दंडावर ७५ टक्के सवलत मिळणार आहे. यापूर्वीच्या 'अभय योजने'चा लाभ घेतलेल्या थकबाकीदार मिळकतदारांना मात्र याची सवलत दिली जाणार नाही. महापालिकेची मिळकरदारांकडे सुमारे १३ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ३ हजार १५८ कोटी मुळ मिळकतकराची थकबाकी असून, त्यावर दंडाची रक्कम ९ हजार कोटी रुपयांची आहे. वर्षानुवर्षे हा मिळकतकर थकीत असल्याने महापालिका प्रत्येक महिन्याला त्यावर दोन टक्के व्याज आकारते. परिणामी, थकबाकीची रक्कम वाढतच असल्याचे समोर आले आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'अभय योजना' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

# मुरलीधर मोहोळ यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतले मोठे निर्णय

## नवले पूल येथे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी विविध यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**पुणे | प्रतिनिधी**

नवले पूल परिसरातील अपघात थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आवश्यक असल्या तरी त्या पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे. त्यामुळे तातडीने राबवायच्या अल्पकालीन उपाययोजनांची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर निश्चित करण्यात आली असून, या उपाययोजना त्वरित अमलात आणाव्यात, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले.नवले पूल येथे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी विविध यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली

या बैठकीस आमदार भीमराव तापकीर, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी संजय कदम, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि इतर उपस्थित होते.या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही उपाययोजनाबाबत सूचना केल्या आहेत.

त्यानुसार जांभूळवाडी ते वडगावदरम्यान उपाययोजना केल्या जाणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील रस्ता सुरक्षा समितीची बैठक निश्चित तारखेनुसार नियमित व्हावी, सेवा रस्त्यांची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वडगाव पुलाच्या रुंदीकरणाचे काम तत्काळ सुरू करावे, अशा स्पष्ट सूचना मोहोळ यांनी दिल्या.जांभूळवाडी ते वारजे रिंगरोड आणि जांभूळवाडी ते रावेत उन्नत मार्ग हे नवले पुलाजवळील अपघात कमी करण्यासाठीचे मुख्य कायमस्वरूपी उपाय असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.



### या उपाययोजना तातडीनं राबविणार

- स्पीड गन्सची संख्या तीनवरून सहा करणे
- वाहनांची वेगमर्यादा प्रतितास ६० वरून ३० कि.मी.
- रस्त्यावरील रिफ्लेक्टर्सची संख्या वाढवणे
- पीएमपीने अधिकृत बसथांबे उभारणे
- सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे त्वरित हटवणे

> "बैठकीत सर्व यंत्रणांवर स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या बैठकीच्या इतिवृत्तानुसार कोणत्या यंत्रणेने कोणते काम केले याचा आढावा डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात घेतला जाईल."
>
> - मुरलीधर मोहोळ, खासदार

# मंचरच्या पहिल्या निवडणुकीत मोठा पेच! तिकीट कुणाला?

## आंबेगाव तालुक्याची राजकीय राजधानी असलेल्या मंचर नगरपंचायतीची प्रथमच निवडणूक होत आहे .

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याची राजकीय राजधानी असलेल्या मंचर नगरपंचायतीची प्रथमच निवडणूक होत आहे .त्या पार्श्वभूमीवर येथील नगरपंचायतीच्या निवडणुकीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. खरे तर मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीत तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षाच्या इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. जि. प. गट आणि पंचायत समिती गणांसाठी गळ लाऊन बसलेल्यांची संख्या मोठी असल्याने तिथे काही डाळ शिजेल की नाही, त्या अगोदर मंचर नगरपंचायतसाठी अनेकांचे इच्छूकांचे प्रयत्न सुरू आहेत.

अशा परिस्थितीत तिकीट हाडाच्या कार्यकर्त्यांना द्यायचे की लाडाच्या कार्यकर्त्यांना द्यायचे, असा पेच प्रक्षश्रेष्ठींसमोर उभा राहिला आहे.दरम्यान नगरपंचायत निवडणूकच्या पार्श्वभूमीवर मंचर शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले असल्याचे दिसून येते. निवडणुकीची तारीख जाहीर होताच सर्वच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सज्ज झाले असून गल्ली, बोळात आता एकच चर्चा रंगली आहे.नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय हालचालींना आता चांगला वेग आला आहे.

विविध पक्षांचे इच्छुक उमेदवार तिकीट मिळवण्यासाठी आपापल्या पक्षश्रेष्ठींच्या भेटी घेत असल्याचे दिसून येते. काहीजण सोशल मीडियाच्या माध्यमातून आपला प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. तर काहीजण कार्यकर्त्यांसोबत बैठकांचे सत्र घेत आहेत. परिणामी स्थानिक राजकारणात हाडाचे आणि लाडाचे कार्यकर्ते या दोन गटांमध्ये तणाव स्पष्टपणे दिसून येतो. हाडाचे कार्यकर्ते म्हणजे वर्षांनुवर्षे पक्षासाठी निस्वार्थपणे झटणारे आणि प्रचार ते संघटन या सर्व स्तरावर कार्यरत असलेले कार्यकर्ते !




### नावे गुलदस्त्यात...

» आंबेगाव तालुक्याची राजकीय राजधानी म्हणून मंचर शहराकडे पाहिले जाते.तालुक्याचे राजकारण शहरातून चालते, त्यामुळे मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, शिवसेना (उबाठा), शिवसेना, काँग्रेस आणि भाजप, अशा सर्वच पक्षांचे इच्छुक उमेदवार निवडणुकीसाठी सज्ज असून इच्छुकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आणि प्रत्यक्ष भेटीगाठीवर आतापासूनच भर दिलेला दिसतो. मात्र, प्रत्यक्षात तिकीट कुणाला मिळणार हे पक्षश्रेष्ठीच ठरवणार असल्यामुळे सध्या तरी इच्छुकांची उमेदवारी गुलदस्त्यात आहे.

### निवडणुका एकत्र शक्य

» एकूणच राजकीय दृष्ट्या परंपरेने चुरशीच्या राहिलेल्या मंचर शहरात मुख्य लढत ही अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विरोधात शिवसेना (उबाठा) तसेच भाजप, अशी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी नुकत्याच एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या नुवडणुका एकत्र लढणार असल्याचे वक्तव्य केले असल्याने संदिग्धता वाढली आहे. मंचर नगर पंचायतीच्या निवडणूक प्रचारात रंगत वाढली असून गुप्त बैठका, सोशल मीडिया आणि रणनीती आखणीच्या हालचालींनी निवडणुकीचे चित्र रंगात आले असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

### "खास माणसं"

» हाडाचे कार्यकर्ते म्हणजे वर्षांनुवर्षे पक्षासाठी निस्वार्थपणे झटणारे आणि प्रचार ते संघटन या सर्व स्तरावर कार्यरत असलेले कार्यकर्ते ! तर लाडाचे कार्यकर्ते हे सहसा नेतृत्वाच्या जवळचे आणि "खास माणसं" म्हणून ओळखले जाणारे असतात. निवडणुकीच्या काळात नेत्यांच्या जवळ राहून प्रभाव दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे हाडाचा विरुद्ध लाडाचा हा संघर्ष आता प्रत्येक पक्षात रंगताना दिसून येत आहे.

# "बिहारमध्ये प्रत्येकी 10 हजार वाटले"; शरद पवारांनी निवडणूक आयोगावर साधला निशाणा

## पारदर्शक व स्वच्छ वातावरणातील निवडणूक, रेवडी वाटप यावर चिंता व्यक्त करीत निवडणूक आयोगावर निशाणा साधला

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक होण्यापूर्वी महायुतीने लाडक्या बहीण योजनेचे पैसे वाटले होते. तसेच बिहार निवडणुकीत मतदान महिलांनी हाती घेतले. निवडणुकीदरम्यान प्रत्येक महिलेच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये पडले. त्याचाच परिणाम बिहार निवडणुकीच्या निकालावर दिसत आहे. या निवडणुकीत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली.

शरद पवार हे बारामती येथील दौऱ्यावर आल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत त्यांनी पारदर्शक व स्वच्छ वातावरणातील निवडणूक, रेवडी वाटप यावर चिंता व्यक्त करीत निवडणूक आयोगावर निशाणा साधला. नगरपरिषद निवडणुकीत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार दिल्याचे सांगून भाजपाशी युती नको, या वक्तव्याला पवार यांनी बगल दिली.पवार म्हणाले की, आता प्रश्न असा आहे की, यापुढच्या निवडणुकीत ज्याच्या हातात सत्ता आहे.

त्यांनी निवडणुकीपूर्वी पैशाचे वाटप करून निवडणुकीला सामोरे जायचं, ही भूमिका घेतली तर निवडणूक पद्धतीबद्दल लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल, याची चिंता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाचं वाटप करणं योग्य आहे का, याचा विचार जाणकारांनी केला पाहिजे. निवडणूक आयोगाने सुद्धा याचा विचार केला पाहिजे. दहा-दहा हजार रुपये वाटणं ही काय लहान रक्कम नाही. 50 वर्षांपूर्वी वाटप हे लहान प्रमाणात होते.

ते म्हणाले, देशात सर्वच राज्यांत 50 टक्के मतदान हे महिलांचे आहे. त्यांना दहा-दहा हजार रुपये देणं आणि त्यानंतर निवडणुकीला सामोरे जाणं, याचा अर्थ या निवडणुका पारदर्शक आणि स्वच्छ वातावरणात होतात का? याबाबत लोकांच्या मनात शंका आहे. याचा विचार निवडणूक आयोगाने केला पाहिजे, असा टोला त्यांनी लगावला.



### स्थानिकांनी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा

» राज्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत पवार म्हणाले, कुठे कुठे युती झाली आहे. मला माहित नाही, माझ्या पक्षापुरते मी सांगतो की, आमच्यात अशी चर्चा झाली आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्ही पक्ष म्हणून जात नाही. त्या- त्या तालुक्यात जिल्ह्यात स्थानिक पदाधिकाऱ्यांनी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा. हा अधिकार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आहे, असे पवार यांनी सांगून दोनच दिवसांपूर्वी केलेल्या वक्तव्याला बगल दिली आहे.